# दिवाणी किर. अर्ज नं. ४०१/२०१२ मधील नि.१२७ खालील आदेश

**CNR : MHSN06001409-2012**

**(रामचंद्र कदम वि लहुदास कदम आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी जाहिर होऊन मिळणेकरीता, तथाकथित बोगस खरेदीदस्त रद्द होऊन वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या वारसातर्फे वारस अभिलेखावर घेणेसाठी सदरचा अर्ज हा दाखल केलेला आहे. वादी क्र. १/१ श्री. गोपीचंद रामचंद्र कदम हे दि.०६.०३.२०२१ रोजी मालगाव, ता. मिरज, जि. सांगली येथे मयत झालेले आहेत. वादी क्र. १/१ श्री. गोपीचंद रामचंद्र कदम यांचे वारस-

**१/१ गोपीचंद रामचंद्र कदम (मयत)**

**१/१ श्रीमती ललिता गोपीचंद कदम (पत्नी)**
वय-५३ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा. - मालगाव, ता. मिरज, जि. सांगली

**१/२ श्री. महेंद्र गोपीचंद कदम (मुलगा)**
वय-३३ वर्षे, व्यवसाय- वाहनचालक
रा. - मालगाव, ता. मिरज, जि. सांगली

**१/३ सौ. गिता बाळकृष्ण गजाकोष (मुलगा)**
वय-३६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा. - कल्याण उल्हासनगर नं.०१,
शनिमारुती मंदिराजवळ, ता. कल्याण, जि. ठाणे

**१/४ श्री. राहुल गोपीचंद कदम (मुलगा)**
वय-३२ वर्षे, व्यवसाय- काहीनाही
रा. - मालगाव, ता. मिरज, जि. सांगली

सदरचे वारस १/१, १/२, १/३, १/४ हे दावेकामी वादी नं. १/१ चे वारस आहेत, तरी वादीचे वारसांनी अभिलेखावर वादी क्र. १/१ चे वारस म्हणून दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. सदरचे वारस हे ९० दिवसांत

अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतु कोरोना संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे सदरचे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस सुमारे सहा महिन्यांचा उशीर झालेला आहे. तरी झालेला विलंब माफ होऊन सदरचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, प्रतिवादी यांना सदरचा अर्ज मान्य व कबुल नाही. सदरचा अर्ज हा वेळेत केलेला नाही. वादी यांचा अर्ज विकल्पेकरुन मंजुर करणेचे झालेस खर्चाच्या रक्कमेसह मंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, वादी क्र. १/१ यांच्या वारसांना सदरचा दावा चालविण्याचे व त्यांचे म्हणणे लक्षात घेण्याची संधी देणे न्यायोचीत वाटत आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. मयत वादीचे वारस हे सदर कामी आवश्यक पार्टी असल्याचे दिसून येत असल्यामुळे दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. वादी यांना त्या अनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादी यांचा अर्ज मंजुर.

**०२.** वादी यांनी मयत वादी क्र. १/१ यांचे वारस अभिलेखावर आणावे. त्या अनुषंगाने दाव्यामध्ये आज पासून १४ दिवसाच्या आत नि. क्र. १ वर दुरुस्ती करावी.

सही/-
(श्रीमती एम. एस. मनगुळी)
दि.१०.०३.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | II$^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 10/03/2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 10/03/2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 10/03/2022 |